महाराष्ट्र शासन

# शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद भंडारा यांचे कार्यालय

जि. प. चौक भंडारा-441904
दुरध्वनी क्रमांक – (07184) 252304 ई-मेल आयडी - ssabhandara1@gmail.com
(07184) 253430 eopryzp@gmail.com

क्रमांक भजिप/शिविप्रा/ 3468 /2026 दिनांक 03 AUG 2026

प्रति,

गटशिक्षणाधिकारी

पं. स. ----------(सर्व)

विषय:- मित्र उपक्रम ( आनापान ) कार्यशाळेला उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ:- 1) मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र , पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र. राशैसंप्रप/कला/मित्र उपक्रम प्रशिक्षण /सन2026-27 दिनांक 29/05/2026

2) समन्वयक सेंट्रल इंडिया विपश्यना ट्रेनिंग ट्रस्ट यांचे पत्र दिनांक 08/07/2026

उपरोक्त संदर्भिय विषयान्वे आपणास सूचित करण्यात येत आहे की. जिल्हयातील सर्व शाळांमध्ये 5 वी ते 10/12 च्या वर्गाकरीता मित्र उपक्रमातंर्गत आनापान साधना मधून विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौध्दिक वाढीकरिता उपयुक्त ठरणार आहे.

संदर्भ क्रमांक 2 नुसार इयत्ता 5 वी ते 10/12 च्या विद्यार्थ्यांकरिता परिपाठाच्या वेळेला 10 मिनिटे व शाळा सुटण्यापूर्वी 10 मिनिटे आनापान साधनेचा सराव विद्यार्थांना देण्याबाबतचे लेखी आदेश मुख्याध्यापकांना देण्यात यावे. केंद्रप्रमुख यांनी शिक्षण परिषदेमध्ये सदर विषयावर मार्गदर्शन करण्यात यावे. या करिता सदर कार्यशाळेचे आयोजन **धम्मभंण्डार विपश्यना केंद्र**, राहुल कॉलनी रेल्वे लाईन जवळ, सहकार नगर, भंडारा येथे दिनांक 08/08/2026 रोजी शनिवारी सकाळी 09.00 ते 12.00 वाजेपर्यंत (तीन तास) करण्यात आले आहे . सदर कार्यशाळेला जिल्हयातील सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, साधन व्यक्ती, मित्र उपक्रमाशी संपर्क 04 उत्कृष्ट शिक्षकांना यांना उपस्थित राहण्याकरिता आदेशित करण्यात यावे.

सहपत्र - मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र , पुणे यांचे पत्र

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, भंडारा.

प्रतिलिपी-

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, भंडारा यांना माहितीस्तव सविनय सादर.